(1,1) -2-1 and 4.indd 30-Jun-18 1:34

सोमवार दि. २ जुलै २०१८

साप्ताहिक कोकण दिनांक

# हळबे महाविद्यालयात छत्रपती शाहू महाराज जयंती संपन्न



दोडामार्ग –

येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे राजर्षी त्रपती शाहू महाराज जयती मोठया उत्साहात संपन्न झाली. कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्रमुख व्याख्याते प्राचार्य डॉ. वि. अ. पाटील यांच्या शुभहस्ते प्रारंभी दीपप्रज्वलन व शाहू महाराजांच्या प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करुन व पूजन करण्यात आले. यावेळी डॉ. पाटील यांनी छत्रपती शाहू महाराजांच्या सामाजिक व राजकीय व कृषीविषयक कार्याचा विद्यार्थ्यांना परिचय करुन दिला. त्यांच्या दूरदृष्टी धोरणावर बोलतांना ते म्हणाले की छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा जोतिराव फुले यांच्या विचारांना खऱ्या अर्थाने वारसा पुढे चालविण्याचा प्रयत्न त्यांनी केला. वेदोक्त प्रकरण हे शाहूंच्या विचाराला कलाटणी देणारे असल्याचे सांगून त्यामुळे बहुजन समाजातील प्रबोधनासाठी चालना मिळाल्याचे डॉ. पाटील यांनी सांगितले.

यावेळी शाहू महाराजांच्या कार्यकर्तुत्वार आधारीत माहितीपट दाखविण्यात आला. कार्यक्रमाचे औचित्य साधून राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे उद्घाटन प्राचार्यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे प्रमुख डॉ. रा. शं. इंगळे, प्रा. प्र. ना. ढेपे व प्रा. दिलीप बर्वे तसेच मोठया संख्येने शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्तावीक डॉ. रा. शं. इंगळे यांनी केले व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. निकिता समर्थ हिने केले शेवटी आभार प्रियांका गवस हिने मानले.